आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२४ ऑक्टोबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आंध्रप्रदेशात बस अपघातात २० जणांचा मृत्यू

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रोजगार मेळाव्यात ५१ हजार युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी कमाल २ अपत्यांचं निर्बंध हटवण्याचा तेलंगणा सरकारचा निर्णय

**आणि**

- जाहिरात क्षेत्रातले दिग्गज पियुष पांडे यांचं आज सकाळी मुंबईत निधन

**<><><><>**

आंध्र प्रदेशमध्ये कुर्नुल इथे आज पहाटे खाजगी प्रवासी बसला लागलेल्या आगीत किमान २० जणांचा मृत्यू झाल्याच कुर्नुलच्या पोलीस अधीक्षकांनी म्हटलं आहे. हैद्राबादहून बंगळुरूला जाणाऱ्या या खाजगी बसमध्ये ४१ प्रवासी होते, त्यातल्या २१ प्रवाशांना वाचवण्यात यश आलं असून त्यांना रुग्णालयात दाखल केल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे. दुचाकीला धडक झाल्यानंतर या बसनं पेट घेतला. त्यात बसचा दरवाजा उघडता न आल्यानं प्रवाशी बाहेर पडू शकले नाहीत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदतनिधीतून मृतांच्या कुटुंबियांना २ लाख रुपयांची  आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर झाली आहे.

आंध्र आणि तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनीही या अपघाताप्रकरणी शोक व्यक्त केला असून मदतीचं आश्वासन दिलं आहे.

**<><><><>**

देशाच्या युवावर्गाची स्वप्ने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी नवी दिल्लीतल्या सतराव्या रोजगार मेळाव्याला व्हिडीओ संदेशाच्या

माध्यमातून संबोधित करताना म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र वितरणाचा कार्यक्रम आज सतराव्या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून देशभरात होत आहे. या रोजगार मेळाव्यात वेगवेगळ्या सरकारी खात्यांमध्ये पद मिळालेल्या ५१ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत ११ लाख नियुक्त्या करण्यात आल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड प्रधानमंत्री बाइट**

त्यांनी यावेळी विकसित भारत योजनेची घोषणा केली. साडेतीन कोटी युवकांना रोजगार देण्याचं उद्दिष्ट या योजनेतून साध्य करण्याचं उद्दिष्ट आहे.

या मेळ्याचा भाग म्हणून मुंबईत झालेल्या कार्यक्रमात राज्याचे मंत्री आशिष शेलार, उद्योजकता आणि कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा आणि महाराष्ट्र गोवा सर्कलचे पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह यांच्या हस्ते ८० उमेदवारांना नियुक्तीपत्र दिली गेली. याविषयी उमेदवारांनी आकाशवाणीकडे समाधान व्यक्त केलं.

**होल्ड - उमेदवार बाइट**

नागपूरात झालेल्या रोजगार मेळाव्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी उमेदवारांना नियुक्तीपत्रं दिली.

**<><><><>**

देशात १० कोटी स्मार्ट मीटर लावण्याचं लक्ष्य ठरवण्यात आलं असून आतापर्यंत त्यातील १ कोटी मीटर बसवण्यात आल्याचं केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहरलाल यांनी म्हटलं आहे. ते आज हरियाणातल्या रोहतक इथं बोलत होते. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना आपल्या तक्रारी थेट करता येतील. त्याचप्रमाणे ते आपला वीजेच्या वापर नियंत्रित करुन वीज वाचवू शकतील. असंही ते म्हणाले.

**<><><><>**

हवामान बदलाची परिस्थिती लक्षात घेता गेल्या काही वर्षांप्रमाणे देशात थंडीची लाट येण्याची शक्यता गृहीत धरुन त्यासाठी पूर्वतयारी करावी असी सूचना राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने १९ राज्य सरकारे आणि ४ केंद्रशासित प्रदेशांना दिली आहे. २०१९ ते २०२३ या कालावधीत थंडीच्या लाटेमुळे ३ हजार ६३९ मृत्यूंची नोंद झाल्याची माहिती आहे.

विशेषतः दुर्बल समाजघटकांना थंडीच्या तडाख्यापासून संरक्षण देण्याच्या हेतूने मानवाधिकार आयोगाने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन आयोगाला मार्गदर्शकपर सूचना केल्या आहेत.

<><><>

जागतिक पोलिओ दिनाच्या निमित्ताने केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी नड्डा यांनी पोलिओ निर्मूलनाच्या बाबतीत भारताने केलेलं काम अधोरेखित केलं. लोकसहभाग आणि एकही मूल पोलिओ डोसाविना राहू नये यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन केलेल्या कामाचा पोलिओ निर्मूलनात महत्वाचा वाटा आहे, असं नड्डा यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><>

तेलंगणाच्या मंत्रिमंडळानं राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी दोन अपत्यांच्या निर्बंधाची अट रद्द करायला मान्यता दिली आहे. याबाबत यापूर्वी झालेल्या निर्णयाच्या अनुषंगानं तेलंगणा मंत्रिमंडळानं तेलंगणा पंचायत राज अधिनियम, २०१८ च्या कलम २१ च्या पोटकलम ३ मध्ये सुधारणा करायला काल मंजुरी दिली.

आता या सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार एक अध्यादेश जारी करून, तो राज्यपालांच्या मंजुरीसाठी पाठवणार असल्याचं तेलंगणाचे महसूल मंत्री पी. श्रीनिवास रेड्डी यांनी बातमीदारांना सांगितलं.

<><><>

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १२२ मतदारसंघासाठी १ हजार ३०२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज भरले आहेत. दुसऱ्या टप्प्यात एकूण २० जिल्ह्यांमध्ये मतदान होणार आहे. अर्ज भरण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकूण १ हजार ७६१ अर्ज आले होते.

<><><>

आधुनिक भारतीय जाहिरात क्षेत्राचे शिल्पकार पियुष पांडे यांचं मुंबईत आज सकाळी निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. गेले काही दिवस ते विषाणू संसर्गाने आजारी होते.

ऑगिल्व्ही या जाहिरात कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष असलेले पांडे यांना २०१६ साली पद्मश्री ने सन्मानित करण्यात आलं होत.

भारतीय जनता पक्षाच्या ‘अबकी बार मोदी सरकार’ या जाहिरातीचे, तसंच पोलिओ लस अभियानाच्या ‘दो बूंद जिंदगी के’ या जाहिरातींचे ते जनक होते. कॅडबरी डेरी मिल्क, एशियन पेंट्स, वोडाफोन इत्यादी अनेक सुप्रसिद्ध कंपन्यांच्या जाहिरातींच्या कल्पना त्यांनीच यशस्वी केल्या होत्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

अमेरिकेने रशियाच्या दोन सर्वात मोठ्या तेल कंपन्यांवर लादलेले ताजे निर्बंध म्हणजे रशियावर दबाव टाकण्याचा प्रयत्न आहे, मात्र या निर्बंधांचा रशियाच्या अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम होणार नाही असं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी म्हटलं आहे. हे निर्बंध मित्रत्वात बाधा आणणारे असून, रशिया आणि अमेरिकेतील संबंधांमधल्या अलिकडच्या प्रगतीच्या दृष्टीनं ते  योग्य नसल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेनं अलिकडेच रोसनेफ्ट आणि लुकऑइल या रशियाच्या दोन सर्वात मोठ्या तेल उत्पादक कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत.

<><><><>

बहारीनमध्ये सुरू असलेल्या आशियायी युवा स्पर्धांमध्ये १८ वर्षांखालील मुलं आणि मुलींच्या भारतीय कबड्डी संघानं सुवर्ण पदक पटकावलं आहे. मुलींच्या संघानं इराणला ७५-२१ असं १२ वर्षातल्या सर्वात मोठ्या फरकानं नमवलं. मुलांच्या संघानं इराणला ३५-३२ असं हरवलं.

या स्पर्धेत मुलींच्या १०० मीटर अडथळ्यांच्या धावण्याच्या स्पर्धेत ठाण्याची शौर्या अंबुरे हिला रजत पदक मिळालं.

//<><><><>//